# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ३०** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:-०१** **प्रशासक ठराव क्र.:-१६५** **दिनांक :-२७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/३६/२०२४ दि.२५/०९/२०२४

३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.१०/०९/२०२४ चा अभिप्राय

४. उपायुक्त (सा.प्र.)यांचा दि.१२/०९/२०२४ चा अभिप्राय

५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१२/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे बाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणेबाबत पंप ऑपरेटर यांची मागणी क्रं.१४१०४ दि.१०/०९/२०२४ रोजी दिलेली असुन तसेच रिपोर्ट क्र.१९७९६ दि.१०/०९/२०२४ नुसार अखेर डिझेल साठा ३८८० लिटर शिल्लक असुन सदर डिझेल साठा ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास वेळोवेळी पारीत ठरावान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.२०/०८/२०२४ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.०६/२०२४-२५ दि.१०/०९/२०२४ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,०४,४८०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता मिळण्यासाठी सहा.आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ३०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-१६६** **दिनांक :-२७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०३ यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./प्र.स.क्र.०३/२७/२०२४-२५ दि.२६/०९/२०२४
३. सहाय्यक आयुक्त (महसुल) यांचा दि.१०/०७/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त (महसुल)यांचा दि.१७/०७/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१९/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मरहुम मोहब्बत खान मुलतानी सामान्य रुग्णालय यावर आकारण्यात आलेली आकारणी रद्द करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०३ यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रभाग समिती क्रं.०३ झोन क्रं.०४ मधील मालमत्ता क्रं.१३१० वर फेरमुल्यांकन करते वेळी मनपा नियुक्त अभिकर्ता स्थापत्य कंन्सलटन्सी व्दारा मरहुम मोहब्बत खान मुलतानी सामान्य रुग्णालय, अक्सानगर येथील दवाखान्यावर आकारणी करण्यात आलेली आहे. सदरची मालमत्ता आपल्या महानगरपालिकेची असल्यामुळे यापुर्वी त्या फेर मुल्यांकन मालमत्तेवर कर आकारणी नव्हती.

प्रभाग समिती क्रं.३ मधील झोन क्रं.सी-४ मध्ये महानगरपालिकेचा दवाखाना मरहुम मोहब्बत खान मुलतानी सामान्य रुग्णालय अक्सानगर मेहरुण गट नं.१६ कार्यरत असून या दवाखान्याच्या इमारतीस फेरमुल्यांकनाचे काम करतांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

दवाखाना इमारतीस मालमत्ता क्रं.१३१० वर नोंद घेण्यात आलेली असून या मालमत्तेवर आज रोजी रक्कम रु.४,१६,९९०/- + शास्ती अशी रक्कम थकीत आहे.

सदरची मालमत्ता ही मनपा मालकीची असून या इमारतीस मनपाचाच दवाखाना कार्यरत असल्याने या मालमत्तेवर चुकीने आकारणी केल्याचे दिसून येते. प्रस्तावित केलेनुसार मनपा मालकीच्या दवाखाना इमारतीवर मालमत्ता क्रं.१३१० वर झालेली मालमत्ता कराची आकारणी रद्द करणेस तसेच या मालमत्तेवर असलेली मालमत्ता कराची रक्कम रु.४,१६,९९०/- + शास्ती मात्रची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अन्वये असलेल्या तरतुदीनुसार (कर निर्लेखित करणे) निर्लेखित करणेस मान्यता मिळण्यासाठी प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०३ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ३०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-१६७** **दिनांक :-२७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जशमनपा/लेखा/४०८/२०२४-२५ दि.२४/०९/२०२४
३. प्रमुख लेखापाल यांचा दि.२३/०९/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.२३/०९/२०२४ अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२३/०९/२०२४ अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२४-२५ ते २०२६-२७ पावेतो (ऑक्टोंबर २०२४ पासुन) दरमहा/ वार्षिक जी.एस.टी./ जि.एस.टी. टी.डी.एस. भरणा करणे व त्यासंबंधी सर्व कामकाज करणेकामी सनदी लेखापाल यांचे नियुक्तीबाबत.

---

वाचा क्र.१ व मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२४-२५ ते २०२६-२७ पावेतो (ऑक्टोंबर २०२४ पासुन) दरमहा/ वार्षिक जी.एस.टी./ जि.एस.टी. टी.डी.एस. भरणा करणे व त्यासंबंधी सर्व कामकाज करणेबाबत आयुक्त सो यांचे दि.२६/०७/२०२४ चे मान्यतेने दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने दरपत्रकात नमुद केले प्रमाणे एकुण तीन सनदी लेखापाल यांचे कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये प्राप्त झालेले असुन दि.२८/०८/२०२४ रोजी निविदा समिती समोर लिफाफा क्र.१ उघडण्यात येवुन त्यामध्ये दोन सनदी लेखापाल यांनी अपुर्ण कागदपत्रे सादर केलेली असल्याने त्यांना इकडील दि.२८/०८/२०२४ चे पत्रान्वये कागदपत्रांची पुर्तता करणेकामी पत्र देण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने सर्व सनदी लेखापाल यांना निवड समितीने पात्र ठरविलेले असुन लिफाफा क्र.०२ उघडले असता त्यात तीनही सनदी लेखापाल यांचे प्राप्त झालेले दर पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | सनदी लेखापाल संस्थेचे नांव | दर रक्कम रु. (तिन वर्षा करीता) | रॅंक |
|---|---|---|---|
| १ | शाम सदरीया ॲन्ड असोसीएट्स | २,२५,०००/- | १ |
| २ | भुतडा जांगीड ॲन्ड रामचंदाणी | ३,००,०००/- | २ |
| ३ | मे.साई ॲन्ड कंपनी | ३,१८,६००/- | ३ |

वरिल नमुद तुलनात्मक तक्त्यातील तिन सनदी लेखापालांपैकी शाम सदरीया ॲन्ड असोसीएट्स,जळगांव यांचे दर रक्कम रु.२,२५,०००/- मात्र सर्वात कमीचे प्राप्त झालेले असल्याने शाम सदरीया ॲन्ड असोसीएट्स,जळगांव यांची सन २०२४-२५ ते २०२६-२७ पावेतो (ऑक्टोंबर २०२४ पासुन) दरमहा/ वार्षिक जी.एस.टी./ जि.एस.टी. टी.डी.एस. भरणा करणे व त्यासंबंधी सर्व कामकाज करणेबाबत नियुक्ती करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरचा खर्च सनदी लेखापाल मानधन या लेखाशिर्षाखाली करण्यास मान्यता मिळण्यासाठी मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**महानगरपालिका**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ३०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:-१६८** **दिनांक :-२७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम विभाग/पर्या/१५०/२०२४-२५ दि.२६/०९/२०२४
३. उपायुक्त यांचा दि.२५/०९/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२५/०९/२०२४ अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षगणना करणे कामी स्थायी समितीकडे सुधारित अंदाजपत्रकात एक कोटी वीस लक्ष तरतूद करणेबाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामधील वृक्षगणना करणे कामी ई निविदा क्र.४६८ मनपा संकेत स्थळावर तसेच राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर कामाची अंदाजित रक्कम रु.९०.०० लक्ष गृहीत धरण्यात आलेली होती. सदर कामी निविदा प्रसिध्द केली असता ओरनेत टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड यांचे सर्वात कमीचे प्राप्त दर रुपये २१.५० प्रती झाड मान्य करण्यात आलेले होते. स्थायी समिती सभा ठराव क्र.१०७ दि.०७/०३/२०२४ अन्वये यास मान्यता देण्यात आलेली होती. सदरचे ठरावाप्रमाणे स्थायी समितीने अंदाजित रक्कम रुपये ७५.२५ लक्ष मात्रला मान्यता दिलेली होती.

सन २०२४-२५ या वर्षाचे अंदाजपत्रकात मनपा वृक्ष निधी अंतर्गत रुपये ८५ लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. मक्तेदाराला दिलेल्या कार्यादेशानुसार मक्तेदाराणे आजपर्यंत काम करुन एकूण ४,१७,५९७/- झाडांची गणना केलेली आहे. सदर गणणेनुसार मक्तेदाराचे एकूण रक्कम रुपये ८९,७८,३३५/- मात्रचे पहिले धावते देयक सादर केलेले आहे. शहरातील काही भागातील वृक्ष गणना शासकीय विभागाच्या परवानगी अभावी अपूर्ण आहे. अश्या व इतर ठिकाणांची होणारी वृक्ष गणना लक्षात घेता सदरचे काम अंदाजे रक्कम रु.१२० लक्ष पर्यंत होण्याचा अंदाज आहे.

स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजित खर्च रक्कम रु.७५.२५ लक्ष व कामाची अंदाजित रक्कम रु.९० लक्ष नुसार स्थायी समितीने मंजूर केलेल्या रकमेपेक्षा रक्कम रुपये १४,५३,३३५/- मात्रने जास्त आहे. जास्तचा होणारा खर्च रक्कम रु.१४,५३,३३५/- मात्र ला मंजूरी मिळणेस तसेच या कामापोटी उर्वरित झाडांच्या सर्वेची संख्या लक्षात घेता वर्ष २०२४-२०२५ च्या सुधारीत अंदाजपत्रकात मनपा वृक्ष निधी या शिर्षका अंतर्गत रक्कम रु.१२० लक्ष ची सुधारीत तरतूद करणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र.:-१६९** **दिनांक :-२७/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदा.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५२ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील बाबा मिस्तरी ते जोशी यांच्या घरापर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,७६,५५३/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५३ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील गट नं.२०१ जोशी दुधवाले ते बारी यांच्या घरापर्यंत रोड बनविणे कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,३२३/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५४ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० बळीराम सोनवणे ते अतुल पाटील यांच्या घरापर्यंत रोड बनविणे कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,३४१/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५५ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० श्री उमेश धुमाळे ते राजपुत यांच्या घरापर्यंत रोड बनविणे (२९२/२) कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,२८६/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५६ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील गट नं.१६९ जाधव ते किरण सोनवणे यांच्या घरापर्यंत आर सी सी गटार बांधणे कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,७६,५३८/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५७ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील गट नं.२९२/२ ओंकार पार्क मध्ये रोड बनविणे कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,१६७/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५८ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील विलास माळी ते विलास निकम यांच्या घरापर्यंत रोड बनविणे (२९२/२) कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,३०५/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५९ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील सावखेडा रोड ते धुमाळ यांच्या घरापर्यंत रोड बनविणे (२९२/२) कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,२८६/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./६० दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील ज्ञानेश्वर भोळे, बाळु पाटील गट नं.२९२/२ घरापर्यंत रोड बनविणे कामी मक्तेदार श्री शुभम सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,२८६/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./६१ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील खंडेराव नगर मध्ये ठिक ठिकाणी आर सी सी गटार बांधणे पिंजारी वाडा कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९६,५२०/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./६२ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील प्रशांत मेटकर ते विलास माळी यांच्या घरापर्यंत रोड बनविणे (२९२/२) कामी मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,२८६/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./६५ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील महेश मेटकर ते पिंजारी कापुसवाले यांच्या घरापर्यंत रस्ते तयार करणे कामी मक्तेदार श्री स्वप्नील आसाराम सोनवणे यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,३९४/- मात्र खर्चाची संविदा.

१३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./६६ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील संजु बारी ते राजेंद्र मिस्तरी यांच्या घरापर्यंत आर सी सी गटार बांधणे कामी मक्तेदार श्री योगराज गणेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,७६,६८६/- मात्र खर्चाची संविदा.

१४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./६७ दि.२६/०९/२०२४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१० मधील संजु बारी ते राजेंद्र मिस्तरी यांच्या घरापर्यंत रस्ते तयार करणे कामी मक्तेदार सोनाली नरेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१०,०७,३५९/- मात्र खर्चाची संविदा.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार संविदांची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**